## राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे
## महाराष्ट्र राज्य

| | | |
|---|---|---|
| अतिरिक्त संचालक<br>दूरध्वनी क्रमांक (वै) -<br>कार्यालय दूरध्वनी क्र. - | २६०५८९९६ (वै)<br>२६०५८७३९ (का)<br>२६०५८१३९ (का)<br>२६०५८४७६ (का) | अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटूंब कल्याण, माताबाल संगोपन व शालेय आरोग्य, कुटूंब कल्याण भवन, राजाबहादूर मिलरोड, रेल्वेस्टेशनच्या मागे, पुणे ४११ ००१. Email ID :<br>sncureport@gmail.com,<br>assemblychildhealth@gmail.com |
| आरोग्य सेवा<br>आरोग्य सेवा | | जा.क्र.राकुकका/बाल आरोग्य/माहिती अधिकार/ Yashika Joshi /न.क्र.४८८ / 9039e-22 /२०,<br>दि. 02/03/२०२० |

प्रति,

Yashika Joshi,

BP-33 Pitampura,

Delhi 110034

**विषयः**- माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती मिळणेबाबत.

Yashika Joshi

**संदर्भ** - आपला माहितीच्या अधिकाराचा दि. ३.०२.२०२० रोजीचा ऑनलाईन अर्ज या कार्यालयात दिनांक १८.०२.२०२० रोजी प्राप्त अर्ज

उपरोक्त संदर्भीय विषयानुसार माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये मागितेलेली माहिती रजिस्टर्ड टपालाव्दारे मिळण्याबाबतचा आपला अर्ज या कार्यालयांस प्राप्त झालेला आहे.

त्याअनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, या कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती तयार आहे. मागणी केलेली माहितीची एकूण पृष्ठे १३७ आहेत. एका पृष्ठाची किंमत रुपये २ प्रमाणे १३७ x २ = २७४ व रजिस्टर्ड टपालाचा खर्च रुपये १२० असे एकूण रुपये ३९४ एवढी रक्कम विहित मार्गाचा वापर करुन माहिती अधिकार ( शुल्क व खर्चाचे नियमन) नियम २००५ मधील तरतूदीनूसार सदरची रक्कम लेखाशिर्ष ००७० इतर प्रशासकीय सेवा, ६० इतर सेवा, ८०० इतर जमा रक्कम (१८) माहितीचा अधिकारी ( ००७००-०१६-१) या लेखाशिर्ष अंतर्गत चलनाद्वारे शासकीय कोषागारात सदर रक्कम जमा करुन त्या चलनाची प्रत या कार्यालयास सादर करावी. माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये आवश्यक शुल्क भरल्यानंतर आपण मागणी केलेली माहिती नियमानुसार आपणास देण्यात येईल.

मुद्या क्रमांक १ व २ उपसंचालक आरोग्य सेवा, राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, पुणे ६ या कार्यालयाशी संबंधित आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ६(३) मधील तरतुदीनुसार सदरचा अर्ज जनमाहिती अधिकारी तथा उपसंचालक आरोग्य सेवा, राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, येरवडा,पुणे ६ यांच्याकडे हस्तांतरित करण्यात येत आहे.

तसेच मुद्या क्रमांक ७ हा अन्न व औषध प्रशासन विभागा,मुबई या कार्यालयाशी संबंधित असल्याने माहिती अधिकार अधिनियमातील कलम ६(३) मधील तरतुदीनुसार सदरचा अर्ज जनमाहिती अधिकारी तथा अन्न व औषध प्रशासन विभागा, मुंबई ४०००५१ यांच्याकडे हस्तांतरित करण्यात येत आहे. तरी यासंदर्भात पुढील पत्रव्यवहार परस्पर त्या कार्यालयाशी करुन माहिती प्राप्त करुन घ्यावे, ही विनंती.

(डॉ. लोचना घोडके)
जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक आरोग्य सेवा,
कुटूंब कल्याण, माताबाल संगोपन व शालेय आरोग्य , पुणे १

प्रत पुढील कार्यवाहीस्तव

१) उपसंचालक आरोग्य सेवा, राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग , येरवडा, पुणे ६ यांना माहिती अधिकाराच्या मुळ अर्जासह पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित. मुद्या क्रमांक १, व २ ची माहिती अर्जदारास देण्यात यावी.

२) अन्न व औषध प्रशासन विभाग, सर्व्हे नंबर ३४१, दुसरा मजला, बांद्राकुर्ला कॉलेस, रिझर्व्ह कॅकेच्या समोर , पुर्व बांद्रा, मुंबई ४०००५१ ६ यांना माहिती अधिकाराच्या मुळ अर्जासह पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित. मुद्या क्रमांक ७ ची माहिती अर्जदारास देण्यात यावी.

प्रत माहितीस्तव - रोखपाल, रोख शाखा

महाराष्ट्र शासन, आरोग्य सेवा
उपसंचालक, आरोग्य सेवा
## राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग

उपसंचालक ☎ (०२०)२६६१०१२५
सहा.संचालक – २६६१०१७९
कार्यालय – २६६१०१७८
फॅक्स – २६६१०१८०

**आरोग्य सेवा**

**'परिवर्तन' आरोग्य भवन, विश्रांतवाडी**
पोलीस स्टेशनसमोर आळंदीरोड, येरवडा, पुणे-६.
*Email: ddhsiecb@rediffmail.com, ddhsiecb@gmail.com*

जा.क्र.उपसंआसे/राआशिवसंवि/भांडार/माहिती अधिकार/ /२० २२६८-६९
दिनांक – ९ / ४ /२०२०

प्रति,
यशिका जोशी,
बीपी – ३३, पितमपुरा,
दिल्ली – ११००३४

**विषय :– माहिती अधिकारी अधिनियम २००५.**
यशिका जोशी, यांनी माहिती अधिकारात मागविलेली माहिती.


**संदर्भ** :– या कक्षास दि. १३.३.२०२० रोजी मा.अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा (कुटुंब कल्याण) पुणे, यांचे दि.२.३.२०२० रोजीचे प्राप्त झालेले पत्र व त्यासोबत आपला दि.३.२.२०२० रोजीचा माहितीच्या अधिकाराचा ऑनलाईन अर्ज

उपरोक्त विषयास अनुसरुन वरील संदर्भान्वये आपणास कळविण्यात येते की, आपल्या ऑनलाईन अर्जात मुद्या क्र.१ व २ संबंधी खालील तपशिलात नमूद केलेली माहिती देण्यात येत आहे.

| अर्जातील मुद्या क्रमांक | विचारण्यात आलेली आवश्यक माहिती | सादर करण्यात येणारी माहिती |
|---|---|---|
| 1 | Has the sate Government Formulated a State IEC strategy doucumented for Improvimg Infant and Young Child Feeding Please Provide a copy of the same . | IEC Bearou working for improving Infant and Young Child Feeding IEC Activites by mass Media, mid media and IPC . (Attach Copy) |
| 2 | Has the sate Government Formulated a plan of Action to Implement IEC Programmes in the Please Provide a copy of the same. | There is no seprate IEC Plan for this activites. |

(श्री.राजदीप दिनेश कुलकर्णी)
जनमाहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी
उपसंचालक, आरोग्य सेवा,
राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, पुणे-६

**प्रत माहितीस्तव** :– मा.अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, (कुटुंब कल्याण कार्यालय) पुणे.१




## बाळाचा जन्म झाल्याबरोबर आईचे पहिले चिकाचे दूध बाळास पाजणे आवश्यक आहे. कारण बाळाला त्यातून मिळते प्रत्येक आजारापासून लढण्याची प्रतिकारशक्ती...!

**२६ फेब्रुवारी ते १२ मार्च महिला आरोग्य अभियान**

राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, महाराष्ट्र शासन, पुणे


महाराष्ट्र शासन
स्तनपान
मातृत्वाची शान !
• बाळाचा जन्म झाल्याबरोबर एका तासाच्या आत स्तनपान सुरु करावे.
• लगेच स्तनपान सुरु केल्याने मातेला दूध येण्यास मदत तर होतेच शिवाय प्रसूतीनंतर होणारा रक्तस्त्राव कमी होतो.
• बाळाला आईच्या कुशीत देऊन त्याला पाहिल्यावर व त्याच्या स्पर्शामुळे मनात ममतेची भावना निर्माण होऊन बाळाला मातेची उब मिळते.
• स्तनपानामुळे बाळ व आई यांच्यात भावनिक नाते निर्माण होते व बाळाचा बौध्दिक आणि शारिरीक विकास चांगल्या प्रकारे होतो.
स्तनपान कक्ष
'स्तनपानासाठी मदत, मातेच्या जवळ'
सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन.
राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, पुणे.

ST Stand Hoarding 20 X 10 ft.




शासन निर्णय : आयईसी २०१८ / प्र.क्र. ३३८/आरोग्य ५.